## नि.दि.मु.क्र.०८/२०२१ मधील निशाण क्र.३१ वरील आदेश

## (**CNRNO.MHSI**090000372021)

०१. प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे.

०२. अर्ज व त्यावरील वादी यांच्या जबाबाचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०३. प्रस्तूत अर्जान्वये वादी यांनी प्रतिवादी क्र.०१ यांचे नावात ऋषी उर्फ पुनाजी अशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे. सदर अर्जातील कथनांच्या अनुषंगाने संचिकेचे अवलोकन केले असता, प्रस्तूत दावा हा कायम ताकिदीकरीता दाखल केला आहे. प्रस्तावित दुरुस्ती तांत्रिक असल्याचे दिसून येते.

०४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादी यांना आपल्या कथनांमध्ये दुरुस्ती करता येते. प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप पाहता सदर दुरुस्ती मंजुर करणे न्यायोचित होईल. करिता खालील आदेश :

**:: आ दे श ::**

०१. निशाणी क्र.३१ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

०२. वादीने प्रस्तावीत दुरूस्ती पुढील तारखेस किंवा त्यापुर्वी करावी.

०३. विहीत मुदतीत आदेशाची पूर्तता न केल्यास आदेश आपोआप रद्य समजण्यात यावा.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.11.19 11:05:46 +1000

स्थळ: देवगड ( एस.बी.वाळके )

दिनांकः १८/११/२०२२ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.